# बिटस् पिलानीच्या जीवशास्त्र परिषदेला प्रारंभ

## गोव्यात प्रथमच या परिषदेचे आयोजन

## बिटस् पिलानी संस्थेचा नवनवीन संशोधनावर अधिक भर : डॉ. अंशुमन सरकार

प्रतिनिधी
वास्को

बिटस् पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसमध्ये ४२ व्या तीन दिवसांच्या अखिल भारतीय जीवशास्त्र परिषदेला काल शुक्रवारपासून प्रारंभ झाला. गोव्यात प्रथमच या परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. 'ट्रॅण्डस् इन सॅल ॲण्ड मॉल्युक्युलर बायोलॉजी" या शिर्षकाखाली ही परीषद होत आहे.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या जीवशास्त्र विज्ञान विभागातर्फे प्रा. डॉ. अंगशुमन सरकार यांच्या संयोजनाखाली व बिटस् पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. रघुरामा जी. यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आलेले असून शुक्रवारी सकाळी बेंगळूर येथील इंडियन बायोकेमिस्ट व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे माजी संचालक प्रा. पद्मनाभम बलराम यांच्या हस्ते या परिषदेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी बिटस् पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. रघुरामा, अखिल भारतीय जीवशास्त्र विज्ञान संस्थेचे अध्यक्ष जगतकुमार राय, जीवशास्त्र विज्ञान संस्थेच्या गोवा अध्यक्ष प्रा. विजश्री नायक, प्रा. डॉ. अंगशुमन सरकार उपस्थित होते.

प्रा. रघुरामा यांनी यावेळी बोलताना बिटस् पिलानी संस्था नवनवीन संशोधनावर अधिक भर देंत असून देशातील प्रख्यात संस्था म्हणून अलिकडच्या काळात पुढे आलेली ही संस्था आहे. संशोधन कार्यात संस्थेने बरीच सुधारणा करताना मोठे योगदानही दिलेले असल्याचे सांगितले. डॉ. अंशुमन सरकार यांनी प्रारंभी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी प्रा. जगतकुमार राय यांनीही विचार मांडले. यावेळी अखिल भारतीय जीवशास्त्र परीषदेविषयी माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रा. पद्मनाभम बलराम यांच्या मार्गदर्शनाच्या सत्राने या परीषदेला प्रारंभ झाला.

या परिषदेत प्रख्यात शास्त्रज्ञ प्रा. एस. सी. लखोटिया (बीएचयू वाराणसी), डॉ. समीत चट्टोपाध्याय (संचालक–आयआयसीबी, कोलकाता), डॉ. किशोर पकनीकर (संचालक–एआरआय पुणे), डॉ. देबाशिस मित्रा (संचालक –सीडीएफडी हैद्रराबाद), डॉ. गोपाल कुंडू (संचालक–एनसीसीएस पुणे), डॉ. सौमित्र दास (संचालक –नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बायोमेडिकल जिनोमीक्स, कल्याणी पश्चिम बंगाल), डॉ. जे. के. पाल (संचालक : डी. वाय. पाटील बायोटेक्नोलॉजी ॲण्ड बायोइन्फोर्मेशन इन्स्टिट्यूट पुणे) यांनी आपले संशोधन सादर करणार आहेत. या परिषदेत देशातील सुमारे ३०० शास्त्रज्ञ व संशोधक सहभागी झालेले असून जीवशास्त्र विज्ञान क्षेत्रातील प्रमुख शास्त्रज्ञांची सुमारे ५० व्याख्याने या तीन दिवसांच्या परीषदेत होतील. सेल बायोलॉजीस्टस, बायोकेमिस्टस, मॉलेक्युलर बायोलॉजिस्ट आणि कॉम्प्युटेशनल बायोलॉजिस्टस यांना एकत्र आणणे व नवीन निष्कर्ष सादर करणे हा या परीषदेचा मुख्य उद्देश आहे.



**सांकवाळ : बिटस् पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसमध्ये अखिल भारतीय जीवशास्त्र परिषदेविषयी माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे प्रकाशन करताना पद्मभूषण प्रा. पद्मनाभम बलराम, प्रा. रघुरामा, जगतकुमार राय, प्रा. विजश्री नायक व प्रा. डॉ. अंशुमन सरकार.**

Scanned by CamScanner